## नियमित दिवाणी दावा क्र.१३/२००८ मधील निशाणी क्र.५७ वरील आदेश

वादीने मोजणीचे प्रकरण पुन्हा पाठविण्यासाठी अर्ज दिलेला आहे. त्या अर्जावर प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी निशाणी क्र.५८ वर म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे.

२. वादी, प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. वादीचे अर्जामध्ये कथन की, वादीने प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीची मोजणी होवून हद्दीखुणा कायम होवून मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे. त्यामध्ये उपअधिक्षक, भूमिअभिलेख, माळशिरस यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक केली होती. त्यांनी अहवाल निशाणी क्र.४९ सादर केला आहे. सदर अहवालातील पान क्र.१२९ वर 'अ' आलेख दाखल केलेला आहे. परंतू 'अ' आलेखामध्ये वादीने ज्या जमिनीची मोजणी मागितली होती ती दावा मिळकतीपैकी १–क गट नं.७८/१/२/२/१ व १–इ मधील गट नं. ७८/१/२/२/२ ही मिळकत कोर्ट कमिशनरने 'अ' आलेखामध्ये दाखविलेले नाहीत. त्यामुळे कोर्टाच्या आदेशाप्रमाणे मोजणी करुन गटाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तरी आदेशाप्रमाणे 'अ' आलेखामध्ये नमूद करण्यासाठी प्रकरण उपअधिक्षक, भूमिअभिलेख यांच्याकडे पाठविण्यात यावी अशी मागणी केली आहे.

४. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी अर्जास निशाणी क्र.५८ वरती म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. या प्रतिवादींचे म्हणणे की, वादीचा अर्ज कायदेशीर नाही. कायदयाच्या कोणत्याही तरतुदीखाली नाही. वादीने याच कारणासाठी दिनांक १७.०६.२०१७ रोजी अर्ज दिला होता. त्यास प्रतिवादीने दिनांक २०.०७.२०१७ रोजी म्हणणे दिलेले असून तो अर्ज नामंजूर झालेला आहे. त्या हुकूमाविरुध्द वादीने अपिल केलेले नाही. आता त्याच मागणीसाठी सदरचा अर्ज कायदयाने चालू शकत नाही.

५. प्रतिवादींचे पुढे कथन की, दिनांक १७.०६.२०१७ च्या अर्जावरील हुकूमानंतर मोजणी नकाशाप्रमाणे दुरुस्तीसाठी दिनांक ०१.११.२०१७ रोजी अर्ज दिलेला असून त्यास दिनांक १५.११.२०१७ रोजी म्हणणे दिलेले आहे. त्या अर्जाची चौकशी अजून प्रलंबित आहे. पुन्हा त्याच कारणासाठी सदरचा अर्ज केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. वादीचा अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादीने याच आशयाचा, कारणाचा यापूर्वी निशाणी क्र.५१ वरती अर्ज दाखल केलेला होता. तो दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून नामंजूर केलेला आहे. त्याच कारणासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वेगळे कारण दिलेले नाही. सबब, या व सर्व कारणांचा विचार करता, अर्ज मंजूर करण्यासाठी योग्य व संयुक्तीक कारण असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र.५७ वरील अर्ज खर्चासह फेटाळण्यात येत आहे.

माळशिरस<br>
दिनांक – १०/०१/२०१८

[एस.एस.इंदलकर]<br>
दिवाणी न्यायाधीश व.स्तर<br>
माळशिरस

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. S. Mitragotri**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **10.01.2018.**

(d) Order uploaded on : **23.01.2018.**